२३८.
२३/०२/१८

२४५.
~~२३६~~
२८.०२.२०१८.

श्री. शेख समद हमीद
महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा,लेखाधिकारी,
गट-ब(राजपत्रित),यांची प्राथमिक शिक्षक, जिल्हा
परिषद लातुर या पदावरील सेवा निवृत्तीवेतनाच्या प्रयोजनार्थ
ग्राह्य धरण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
वित्त विभाग,
शासन आदेश क्रमांक :- सेवाजो २०१७/प्र.क्र.१०५/कोषा प्रशा १
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक:- १६ फेब्रुवारी , २०१८

वाचा :- संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. संलेको १०.२०१७/स. अ.१/सेवाजो/शेखसमीदहमद गोअक/४५१/४७००, दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७.

**-: आदेश :-**

श्री. शेख समद हमीद यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा ,लेखाधिकारी गट-ब (राजपत्रित) या संवर्गात शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक ससेभ - २००८/प्र.क्र.१६०/कोषा प्रशा-२ दिनांक १८.१०.२००८ च्या आदेशान्वये परिविक्षाधीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

२. श्री. शेख यांना दिनांक १४.११.२००८ (म.नं) रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,लातुर यांनी सहशिक्षक या पदावरुन कार्यमुक्त केले. श्री. शेख हे दिनांक २२.१२.१९९९ पासून शिक्षण सेवक या मानधनाच्या पदावर सलग तीन वर्षे सेवा समाधानपुर्वक केल्यामुळे त्यांना सहशिक्षक या पदावर स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले आहे. व सहशिक्षक म्हणून पंचायत समिती, औसा, जिल्हा परिषद लातुर येथे दिनांक २१.१२.१९९६ ते १४.११.२००८ या कालावधीत कार्यरत होते.तसेच दि १५.११.२००८ रोजी लेखा व कोषागारे संचालनालयामध्ये कागदपत्राची पडताळणी करिता उपस्थित होते व दिनांक १६.११.२००८ रोजी रविवार सुट्टीचा दिवस असल्याने सदर दोन दिवसाची तांत्रिक खंड क्षमापित करण्यात येऊन दिनांक १७.११.२००८ पर्यंत सेवा जोडून त्यामुळे त्यांच्या सेवेत खंड पडलेला नाही.श्री. शेख यांचा परिविक्षाधीन कालावधी शासन निर्णय वित्त विभाग क्र. पकास- २०११/प्र.क्र.२२०/कोषा प्रशा-२ दिनांक ०४.०८.२०११ अन्वये समाप्त करण्यात आला आहे.

२. उपरोक्त बाबी विचारात घेऊन श्री. शेख समद हमीद यांची "सहशिक्षक" जिल्हा परिषद लातुर या पदावरील दिनांक २१.१२.१९९६ ते १४.११.२००८ या कालावधीतील मागील सेवा सध्याच्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) या पदास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम ३३ मधील तरतूदीनूसार निवृत्तीविषयक लाभाच्या प्रयोजनार्थ अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेण्यास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

३. सदर आदेश वित्त विभाग, सेवा-७ यांनी त्यांच्या दिनांक २.२.२०१८ च्या टिप्पणी अन्वये दिलेल्या सहमतीला अनुसरून निर्गमित करण्यात येत आहेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

(मा.रा.गांधी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
श्री. शेख समद हमीद, लेखाधिकारी, गट-ब (राजपत्रित)जिल्हा परिषद लातुर.
(संचालक लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत)

प्रत,
१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)१/२,महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
२) महालेखापाल (लेखा परिक्षा)१/२,महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
३) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातुर
४) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) निवड नस्ती, वित्त विभाग, कोषा प्रशा १